दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २१३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१३ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नीलेश भाऊच्या पुढे मी ढाल म्हणून उभी राहील सुप्रिया सुळे यांचे अजित पवार यांना प्रत्युत्तर

## सुसंस्कृत महाराष्ट्रात दमदाटी चालणार नाही–सुळे यांचा इशारा;ढवळपुरी येथे प्रचार सभा

**ढवळपुरी । प्रतिनिधी**

पारनेरला झालेल्या सभेत नीलेश भाऊंना दमदाटी करण्यात आली. सुसंस्कृत महाराष्ट्रात दमदाटी चालणार नाही असा इशारा देतानाच हे खपवून घेतले जाणार नाही. नीलेश भाऊंच्या पुढे मी ढाल म्हणून उभी राहिल अशी ग्वाही खा. सुप्रिया सुळे यांनी दिली. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या सभेत सुळे बोलत होत्या. यावेळी सक्षणा सलगर, संपत म्हस्के, किसनराव लोटके, जयंत वाघ, राजेंद्र फाळके, संभाजी रोहोकले, सुवर्णा धाडगे यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी बोलताना सुळे म्हणाल्या, कसली दमदाटी ? दमदाटीला कोणी घाबरत नाही. आजच्या सभेत त्यांचे भाषण सुरू होते एक जण म्हणाला की रामकृष्ण हरी वाजवा तुतारी ! हेच समाजमन आहे. आदरयुक्त भिती असलीच पाहिजे. जे वयाने मोठे आहेत त्यांचा सन्मान केलाच पाहिजे. हे आमचे संस्कार आहेत. पण दमदाटी सुसंस्कृत महाराष्ट्रात चालणार नाही, आम्ही खपवून घेणार नाही. जे नीलेश लंके यांना दम देत आहेत ना त्यांना मला नम्रपणे सांगायचे आहे की दमदाटी तुमच्या घरात करा. ही लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये दमदाटीचा अधिकार कुणालाही नाही. प्रेमाने बोला आदर सत्कार करू. काल ऐकले की आरे ला कारे म्हणावंच लागतं. हे खपवून घेतलं जाणार नाही. नीलेश भाउला कोणी दमदाटी केली ना ढाल म्हणून सुप्रिया सुळे त्याच्या समोर उभी राहिल असा इशारा सुळे यांनी दिला.

सुळे म्हणाल्या, कांद्याला भाव मिळावा यासाठी मी आणि डॉ. अमोल कोल्हे संसदेत भांडलो. त्यामुळे आमचे निलंबन करण्याचे पाप भारतीय जनता पक्षाने केले. तुमचे खासदार डॉ. सुजय विखे यांनी कांद्याला हमीभाव मिळावा म्हणून आंदोलन केले ? भाजपा सरकारने एका उद्योगपतीचे १० हजार कोटी रूपये माफ केले शेतकऱ्याकडे मात्र दुर्लक्ष केले. भविष्यात आपलेच सरकार सत्तेत येणार आहे. पारनेरमधून आमची मागणी ही राहील की १ हजार कोटी रूपये उपलब्ध करून शेतकऱ्याची सरकट कर्जमाफी करावी. कांद्याची निर्यात तात्काळ सुरू करण्यात येईल. एकीकडे पाकिस्तानचा कांदा जगात चालला आहे तर दुसरीकडे भारतातला कांदा सडतो आहे याला जबाबदार कोण असा सवाल सुळे यांनी केला. आपण त्यांच्यासोबत गेलो नाही हे चांगले झाले कारण आज कोणत्या तोंडाने मते मागितली असती ? कांद्याला भाव नाही या लोकांनी आपल्याला कांदे फेकून मारले असते. जे आज तुमच्याकडे मते मागत आहेत त्यांच्या हिमतीला दाद दिली पाहिजे असे सांगत सुप्रिया सुळे यांनी खा.डॉ. सुजय विखे यांच्यावर नाव न घेता टिकास्त्र सोडले. घरात बसणार फेक डॉक्टर आणि लोकसभेत गाजणार लंके फॅक्टर ! असे सांगत सेनापती बापट यांच्यानंतर या तालुक्यातून स्वाभिमानाची तुतारी फुंकण्यासाठी नीलेश लंके हा पठ्ठ्या तयार असल्याचे सक्षणा सलगर यांनी सांगितले. ज्यावेळी सुप्रियाताई संसदेत बोलत होत्या त्यावेळी सुजय विखे कुठे लपून बसले होते ? त्यांना किती वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला ? खासदार म्हणून गावागावांमध्ये ते किती वेळा आले, त्यांनी किती प्रश्न सोडविले ? केवळ स्व. बाळासाहेब विखे यांचा वारसा सांगायचा, सहकार महर्षींचा नातू असल्याचे सांगायचे. आणि मोदींकडे पाहून मतदान करा असे सांगितले जातेय. पोरगी देताना सासऱ्याची संपत्ती पाहून दिली जातेय का ? पोराचं कर्तुत्व पाहता की नाही ? हे असे झालंय पोराकडं पाहूच नका, सासऱ्याकडे पहा ! असे चालेल का ? उमेदवाराची गुणवत्ता काय ? विखे नाव सोडले तर पाच माणसे ओळखणार नाहीत. कोरोनाचा डॉक्टर म्हणून नीलेश लंके यांना अवघा महाराष्ट्र ओळखत असल्याचे सक्षणा सलगर म्हणाल्या. अजितदादांचं भाषण ऐकूण मला दुःख झाले. याला पाडतो, त्याला पाडतो. त्यांनी पाडापाडीचे कॉंट्रॅक्ट घेतलंय काय ? दादा हे बरोबर नाही. मला तुमचा आदर होता, आदर आहे. परंतू तुम्ही जी भाषा वापरताय. अमोल कोल्हेंना पाडतो, अशोक पवारांना म्हणाले तुझी आवकात नाही, हा भाषा आहे का ? कोणी लाख गरीब असो कोणी कोणाची औकात काढायची नसते. तु तुझ्या घरी सोन्याहून पिवळा, मी माझ्या घरी कोळश्याहून काळा. महाराष्ट्राच्या जनतेने ठरविले आहे, गद्दार कोण आणि खुद्दार कोण ते. पवार साहेबांसारख्या ८४ वर्षांच्या योध्याला नामोहरम करण्यासाठी तुम्ही अमित शहा यांच्या टोळीमध्ये सहभागी झाला आहात असा आरोप सक्षणा सलगर यांनी केला. चौंडी येथे धनगर बांधव उपोषणाला बसले होते ऑगस्ट २०२४ मध्ये. १५ दिवस उपोषण सुरू होते. खासदार विखे उपोषणकर्त्यांकडे एकदाही गेले नाहीत. ती माणसं नाहीत का ? ती मेंढरं आहेत का ? आम्ही मेंढरं पाळणारी माणसं आहोत. मला त्याचा अभिमान आहे. तुम्ही का विचारण्यासाठी आले नाहीत. आम्ही माणसं नाहीत का ? अब राजा का बेटा राजा नही बनेगा प्रजाका बेटा राजा बनेगा.राधाकृष्ण विखे मोठे नेते आहेत. सोलापूर येथे धनगर बांधव भेटण्यासाठी आले होते. आमच्या धनगर बांधवाने त्यांच्या डोक्यावर भंडारा टाकला तर त्याला कुत्र्यासारखं मारण्यात आलं. त्याचं उत्तर १३ तारखेला मतदानातून कळेल. आपण या निवडणूकीत विजयी होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. आता तालुक्या–तालुक्यांमध्ये मताधिक्क्याची स्पर्धा लागली आहे. असे असताना पारनेर तालुका मागे राहिला तर त्याची सल माझ्या मनात राहणार आहे. कारण जो तालुका सर्वाधिक मताधिक्य देणार त्या तालुक्यात विजयी सभा घेण्यात येणार आहे. त्यामुळे तालुक्याचे मताधिक्य सर्वाधिक राहिल यासाठी प्रत्येकाने जीवाचे रान करावे.ढवळपुरी ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत एकमेकांविरोधात लढलेले डॉ. राजेश भनगडे, भागानाना गावडे, सुखदेव चितळकर हे लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने मतभेद विसरून तालुक्याच्या स्वाभिमानासाठी एकत्र आले. ढवळपुरीचा हा विचार प्रत्येक गावागावात पोहचला पाहिजे. तालुक्यात राष्ट्रवादी व शिवसेना अशी विचारसरणी आहे. या दोन्ही विचारसरणीही महाविकास आघाडीच्या माध्यमातून या निवडणूकीत एकत्र आलेल्या असल्याने आपल्या तालुक्याचे मताधिक्य एक लाखांपेक्षा अधिक असले पाहिजे अशी अपेक्षा लंके यांनी व्यक्त केली.मी विखे–पिता पुत्रांचे ऐकत नाही. त्यांच्याशी राजकीय तडजोड करत नाही त्यामुळे माझ्यावर गुंडगिरीचा आरोप केला जातोय. मी कधी गुंडगिरी केली ? कोणत्या गोरगरीबावर अन्याय केला ? एखाद्या गरीबावर, सर्वसामान्य व्यक्तीवर अन्याय झाला तर त्याच्याशी दोन हात करण्याची आपली तयारी असते. आपला तालुका स्वाभिमानी आहे. मोठयाला खेटण्याची आपणास सवय आहे. समोरच्या पहिलवानाला दोन ते अडीच लाख मतांनी मी पराभूत करणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला. कोरोना संकटात खानदेशातील अनेक रूग्ण भाळवणीच्या शरदचंद्र पवार आरोग्य मंदिराकडे येत होते. चौकशी केली असता त्या लोकांनी सांगितले की तिथे एक देवदूत आहेत. त्यानंतर आपणही या सेंटरला भेट दिली असता नीलेश लंके हे स्वतः रूग्णांची सेवा करत होते. त्यावेळी वाटले आमदार असावा, नेता असावा तर नीलेश लंके यांच्यासारखा. अशा देवदूताला लोकसभेत पाठविण्याची संधी आपणास मिळाली आहे. त्यांना भरभरून मतदान करावे. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता नीलेश लंके यांनी काम केले. लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने आपल्या तालुक्याला मोठी संधी लाभली असून या संधीचे सोने करायचे आहे. आपल्या तालुक्याच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे. गावपातळीवरील वाद दूर ठेवा गावागावांतून लंके यांना सर्वाधिक मताधिक्य द्यावे. नीलेश लंके यांनी कधीही गरीब–श्रीमंत असा भेदभाव केला नाही. प्रत्येक माणूस माझा आहे ही भावना ठेऊन त्यांनी काम केले आहे. दुसऱ्याची पोरं किती दिवस अंगाखांद्यावर खेळविणार ? दुसऱ्याचं पोरगं ते दुसऱ्याचंच असते. कधीतरी ते द्यावंच लागतं. आपलं ते आपलंचे असतं. पाणी पाजायला आपलंच पोरगं लागतं. हक्काचं पोरगं म्हणजे नीलेश लंके असून त्यांना मोठया मताधिक्क्याने संसदेत पाठवायचे आहे. ढवळपुरी येथे आ. नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेमध्ये खा. सुप्रिया सुळे यांनी मार्गदर्शन केले.

## पुणे,सातारा,लातूर,नांदेडमध्ये गारपीटीचा इशारा,संभाजीनगर, नगर,सांगली,जालन्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट



**पुणे**–राज्यात आजही अवकाळी पावसाची शक्यता कायम आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. तर अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्याला अवकाळी पावसाने झोपडले आहे. यामुळे फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.हवामान खात्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये १३ मे पर्यंत पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार गेल्या दोन दिवसांपासून राज्यात अवकाळी पाऊस कोसळत आहे. पावसाळी वातावरणामुळे उन्हाच्या चटक्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. आग्नेय अरबी समुद्रात केरळच्या किनाऱ्यालगत चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. तर मराठवाड्यापासून कर्नाटक, केरळ ते कोमोरिन भागापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. तसेच राज्यात पूर्वमोसमी पावसाला सुरूवात झाली आहे.आज हवामान खात्याने पुणे, सातारा, लातूर, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वाशीममध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा तर काही ठिकाणी गारपीटीचा यलो अलर्ट दिला आहे. तर राज्यातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, धाराशिव, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.दरम्यान, शुक्रवारी अमरावती, वाशीम, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते जोरदार स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली आहे. ढगाळ आकाशमुळे कमाल तापमानात घट झाली आहे. रविवारीही अवकाळी पावसाचा जोर वाढणार आहे. रविवारी चंद्रपूर जिल्ह्याला गारपीट होण्याची शक्यता आहे. तर पुणे, लातूर, नांदेड, सातारा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. शिवाय मुंबईसह उपनगरात देखील अवकाळी पावसाच्या सरी बरसतील असे हवामान खात्याने म्हंटले आहे.

## लाच प्रकरणात सापडलेल्या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची एसआयटीमार्फत चौकशी करा

### आमदार सुधाकर अडबाले यांची गृहमंत्र्यांकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लाच प्रकरणात सापडलेल्या चंद्रपूर राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांच्या संपत्तीची एसआयटीमार्फत चौकशी करा, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्याचे गृहमंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांच्याकडे केली आहे.



बियरशॉपीचा नवा परवाना देण्यासाठी दीड लाखांची मागणी करणारे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय जयसिंगराव पाटील, दुय्यम निरीक्षक चेतन माधवराव खारोडे आणि कार्यालय अधीक्षक अभय बबनराव खताळ हे लाच प्रकरणात अडकले. यातील अधीक्षक पाटील अजूनही फरार असून खारोडे आणि खताळ यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठवून तीन वर्षांचा काळ लोटला. याकाळात नव्या दुकानांना परवाना देण्यासाठी आणि मासिक हप्तामधून या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दारू विक्रेत्यांकडून कोट्यवधी रूपयांची वसूली केली आहे. या तीन वर्षांच्या काळात या कार्यालयाकडून दिलेल्या परवान्यांची चौकशी करण्यात यावी. तसेच येथील सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी.लाच प्रकरणातील अधीक्षक संजय पाटील अद्यापही पोलिसांच्या हाती लागले नसून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अधीक्षक पाटील यांच्या कोल्हापूर येथील तीन घरांवर छापा टाकला. यात २८ तोळे सोन्याचे दागिने, कोट्यवधी रूपयांची रोकड, आलीशान कार आणि महागड्या दुचाकी या पथकाने जप्त केल्या आहेत.चंद्रपूर राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयातील अधीक्षक संजय पाटील, दुय्यम निरीक्षक चेतन खारोडे आणि कार्यालय अधीक्षक अभय खताळ यांनी बेकायदेशीर मार्गाने गोळा केलेल्या संपत्तीची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी व फरार असलेले अधीक्षक पाटील यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्याचे गृहमंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, गृह विभाग सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त यांच्याकडे केली आहे.

### भरपावसात सुजय विखेंचे दमदार भाषण


## मंडप कोसळला तरीही गाजवली सभा,डोक्यावर खुर्च्या घेत कार्यकर्त्यांचीही घोषणाबाजी



**अहमदनगर**–अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी भरपावसात सभा गाजवली. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. तत्पूर्वी शनिवारी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. अनेक नेत्यांच्या सभांवर या पावसाचा परिणाम झाला. अहमदनगरमध्ये सुजय विखे यांच्या सभेतही पावसाने धुमाकूळ घातला तरीही विखे यांनी पावसात भिजत भाषण केले.विशेष म्हणजे अचानक आलेल्या पावसाने सभा स्थळावरील मंडप कोसळला. यावेळी कार्यकर्त्यांनी थेट खुर्च्या आपल्या डोक्यावर घेत जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर सुजय विखेंनी तुफान भाषण सुरू केले. यामुळे प्रचाराच्या अखेरच्या दिवशी सुजय विखेंनी सभा गाजवल्याचे दिसून आहे. सुजय विखेंच्या सभेची आता जोरदार चर्चा रंगली आहे. या सभेचे फोटो आणि व्हिडिओ चांगलेच व्हायरल होत आहेत.यावेळी भाषणात बोलतांना सुजय विखे म्हणाले, ''आज इथे इतका जोरदार पाऊस सुरू आहे. तरी सुद्धा आमचा एकही कार्यकर्ता डगमगला नाही. अहमदनगर जिल्ह्याला गेली ५० वर्ष विखे पाटील कुटुंबाने सुसंस्कृत राजकारण दिले आहे. या जिल्ह्यात जो कोणी उमेदवार भाषणाच्या माध्यमातून पोलिसांचा अपमान करत असेल, आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून माता–भगिनींचे डोके फोडत असेल, भर सभेत शिवीगाळ करत असेल, अशा माणसाला गाडायचे की नाही ?'' असा सवाल विखे यांनी करताच कार्यर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.दरम्यान, दक्षिण नगरमधून महायुतीतील भाजपचे उमेदवार सुजय विखे विरुद्ध महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे नीलेश लंके यांच्यात लढत होत आहे. विखेंच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सभा घेतल्या आहेत. तर दुसरीकडे लंकेंच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह आघाडीतील अनेक नेत्यांनी सभा घेतल्या. आता या मतदारसंघासाठी १३ मे रोजी मतदान होत आहे.

## सगळ्यांना पाडता मग मुलाला का निवडून आणलं नाही? लोकशाहीत एवढा माज कसला दाखवता?–जितेंद्र आव्हाड

**ठाणे**–अजित पवार आता सगळ्यांना डोस देत सुटलेत, तुला पाडीन, तुला पाडीन करतायेत, मग तुझ्या पोराला निवडून का आणला नाही? लोकशाहीत एवढा माज कसला दाखवता? असे म्हणत शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. तसेच लोकशाहीत एवढा माज कसला दाखवता? ज्या बापाने मला घडवले, त्या बापाचा हात सोडताना ह्दयात जराही कालवाकालव झाली नाही? असा हल्लाही त्यांनी चढवला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या समर्थनार्थ घेतलेल्या सभेत जितेंद्र आव्हाड बोलत होते सभेत बोलतांना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, ''१९९१ मध्ये अजित पवारांना महाराष्ट्रात कोण ओळखत होते? त्या अजित पवारांना लोकसभेची उमेदवारी दिली आणि संसदेत पाठवले. त्यानंतर सातत्याने सत्तेच्या वर्तुळात ठेवले, ४ वेळा उपमुख्यमंत्री बनवले. त्यांना केवळ सत्ता हवी होती. त्या सत्तेसाठी त्यांनी शरद पवारांना घराच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि स्वत: पक्ष ताब्यात घेतला'' असा आरोप आव्हाड यांनी केला आहे.पुढे आव्हाड यांनी शिंदे गटावर देखील टीका केली आहे. ''ज्या मातोश्रीने आईसारखं प्रेम दिले, त्यांनी मातोश्री फोडण्याचे काम केले. या दोन्ही घटना महाराष्ट्राला कधी आवडणार नाही. शिवाजी महाराजांच्या काळातला खंडोजी खोपडे आणि सूर्याजी पिसाळ, यांच्या



औलादींना महाराष्ट्राने कधी ओळख दिली नाही, मोठेपणा दिला नाही. तसेच या नवीन सूर्याजी पिसाळ, खंडोजी खोपडेंना या निवडणुकीत कायमचे संपवून टाका, येणाऱ्या कुठल्याच निवडणुकीत जागा देऊ नका'', असे म्हणत आव्हाडांनी शिंदे गटासह अजित पवार गटावर निशाणा साधला आहे.ते पुढे म्हणाले, आम्हाला संविधान टिकवायचे आहे, भाजपाला संविधानच मान्य नाही. नवीन संसद भवनाचे उद्घाटन झाले, त्यावेळी पत्रक वाटण्यात आलं, त्यात पुरोगामी शब्दच गायब करण्यात आला. अनेक खासदारांनी प्रश्न विचारला तेव्हा चुकून प्रिंटिंग मिस्टेक झाल्याचे ते म्हणाले. धर्मनिरपेक्षता हा शब्द संविधानातून भाजपाला वगळायचा होता. मणिपूरमध्ये महिलांवर बलात्कार झाले, तेव्हा विचार केला नाही. भाजपाला संविधान आणि संसदीय लोकशाही बदलायची आहे'' असा आरोप आव्हाडांनी केला.

## त्यांनी एकमेकांविरोधात काम करणे नव्या पिढीसाठी चांगले नाही–रक्षा खडसे

**मुंबई**–महाजन आणि नाथाभाऊंनी एकमेकांविरोधात काम करणे नव्या पिढीसाठी चांगले नाही असे मोठे विधान रावेर लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार रक्षा खडसे यांनी केले आहे. तसेच नाथाभाऊ पूर्ण ताकदीने माझ्यासाठी काम करत आहेत असेही त्या म्हणाल्या. त्या एका वृत्तवाहिनीशी बोलत होत्या.

मंत्री गिरीश महाजन आणि एकनाथ खडसे यांच्यातील वाद जगजाहीर आहेत. याबाबात रक्षा खडसे यांनी भाष्य केले आहे. ''गिरीश महाजन आणि नाथाभाऊ सोबत येऊन काम करत असतील, तर ते चांगलंच आहे. त्यांनी एकमेकांवर टीका करणे, एकमेकांच्या विरोधात काम करणं आमच्यासारख्या नव्या पिढीसाठी चांगले नाही'', असे रक्षा खडसे म्हणाल्या.पुढे रक्षा खडसे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार श्रीराम पाटील यांच्यावर टीका केली आहे. ''माझ्या विरोधातले उमेदवार श्रीराम पाटील यांनी तीन महिन्यात तीन पक्ष बदलले आहे. ते स्वतःच्या अस्तित्वासाठी निवडणूक लढवत आहे. मात्र ही निवडणूक देशाचे भवितव्य घडवणारी निवडणूक आहे. मुळात देशाचा नेतृत्व कोण करेल, यासाठीची ही निवडणूक आहे आणि त्यामध्ये मी एक माध्यम आहे'', असे रक्षा खडसे म्हणाल्या.तसेच त्यांनी एकनाथ खडसे यांच्याबद्दलही भाष्य केले आहे. ''निवडणूक कोणतीही असो, सर्वांचे सहकार्य आवश्यक असते. नाथाभाऊ माझ्या कुटुंबाचे सदस्य असले तरी ते मधल्या काळात राष्ट्रवादीत गेले होते. मात्र निवडणुकीच्या पूर्वी त्यांनी भाजपमध्ये येण्याची इच्छा व्यक्त केली आणि आता ते माझ्यासाठी या निवडणुकीमध्ये पूर्ण ताकदीने काम करत आहेत. नाथाभाऊंचा पक्षप्रवेश केव्हा होईल याबाबत आता पक्ष संघटना आणि नेतृत्व त्याबद्दल निर्णय घेतील'', असे रक्षा खडसे यांनी स्पष्ट केले.यावेळी बोलतांना रक्षा खडसे यांनी आपल्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. रक्षा खडसे म्हणाल्या की, ''आम्हाला विजयाचा पूर्ण विश्वास आहे. दोन्ही कार्यकाळात आम्ही भक्कम काम केलंय, म्हणून मतदार यंदाही आशीर्वाद देतील. मतदानाची टक्केवारी वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. रावेरमध्ये ६५ टक्के मतदान झाले पाहिजे. संविधानाने दिलेल्या मतदानाचा अधिकार प्रत्येकाने बजवावा'', असे त्यांनी म्हटले.

### माझ्यावर वैद्यनाथाची सावली म्हणून उभे राहून तुम्हीच आशीर्वाद द्या

# कर्तृत्वान लेकीच्या विक्रमी विजयावर परळीतील अभुतपूर्व सभेने केलं शिक्कामोर्तब

## तुमचं प्रेम आहेच-लोकसभेला संधी द्या;जीवाचे रान करुन विकासरुपाने परतफेड करेन-पंकजाताई








**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकसभा निवडणुकीत मतदानरूपी आशीर्वाद देऊन आपले नेतृत्व करण्याची संधी मला आपण सर्वांनी द्यावी. यापूर्वी राज्यात मंत्रिमंडळात काम करत असताना जिल्ह्यातील गाव,वाडी, वस्ती तांड्यापर्यंत विकासाची गंगा आपल्याला आणता आली. तुमचे आशीर्वाद माझे नेतृत्व घडवत आहे.मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे.माझ्यावर तुमचं प्रेम आहेच. यावेळी लोकसभेला संधी द्या.जीवाचे रान करुन विकासरुपाने त्या प्रेमाची नक्कीच परतफेड करेन असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.

बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराची समारोप सभा परळीच्या मोंढा मैदानावर झाली.या अभुतपूर्व विराट जाहीर सभेला छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले, कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, माजी मंत्री संभाजी पाटील, किरण पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी तमाम परळिकरांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले यांचा ह्रदय सत्कार करण्यात आला.यावेळी बोलतांना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं. मला पाच वर्षे मुंडे साहेबांनी मागितले होते मात्र त्यापुर्वीच त्यांचे निधन झाले.आता तुम्हीच वैद्यनाथाची सावली म्हणून माझे आहात. तुम्हीच माझी उर्जा आहात.तुम्हीच माझी या निवडणुकीत काळजी घ्या. तुमच्या सेवेसाठी मी काम करणार आहे हा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.मला जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे. जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आणायची आहे. शेतकरी ऊस तोड कामगारांचे जोवन उंचावण्यासाठी काम करायचं आहे, मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मला हे काम आगामी पाच वर्षात करायचे आहे. जिल्ह्यातील १० हजार तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून घ्यायचा आहे. जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे.यासाठी ही निवडणूक असुन प्रचंड मताधिक्याची मला अपेक्षा आहे असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा आहे.पहिल्यांदा जेंव्हा मी निवडणूक लढली त्यावेळी स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व. पंडितअण्णा मुंडे ,धनंजय मुंडे असा संपूर्ण परिवार या मंचावर होता.त्यानंतर जे घडले ते माझ्यासाठी अस्वस्थ करणारे होते.मी निवडणूक जिंकले,मंत्री झाले, अनेक कामे केली,राजकीय वाटचाल सुरु राहिली.धनंजय मुंडेही विरोधीपक्षनेते झाले,मंत्री झाले त्यांचीही राजकीय वाटचाल सुरु राहिली मात्र मनातील अस्वस्थता कमी झाली नाही.आज आम्ही एक आहोत.आमच्या पक्षांचीही युती झाली. त्यामुळे आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा असल्याचे पंकजाताई यांनी यावेळी सांगितले..

## शरद झोडगे यांनी पंकजाताई यांच्या विजया साठी बालाघाटावर बांधली महायुतीची मोट



**बीड । प्रतिनिधी**

वयाच्या अठराव्या वर्षापासून ते आजतागायत भाजपाचे खंदे समर्थक व हाडाचे कार्यैकर्तै म्हणुन ओळखले जाणारे व विद्यमान बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा भाजपा नेते असलेल्या शरद झोडगे यांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंना खासदार बनवण्यासाठी बालाघाटावर महायुतीची मोट बांधली आहे.शरद झोडगे यांनी आपल्या तरुणाईची सुरुवात भारतीय जनता पार्टीचा कार्येकर्तो म्हणुन केली होती, पक्षाशी असणारी एकनिष्ठता राखत आणी जनतेशी नाळ जोडत त्यांचे कार्य अहोरात्र सुरु असल्यामुळे बालाघाटाच्या गावागावात शरद झोडगे यांचा जनसंपर्क मोठा असुन तरुणांची मोठी फळी त्यांच्या मागे कायम उभी असते. कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार,आणी सामान्य गावकर्यांच्या मदतीसाठी रात्री अपरात्री धावुन जाणारा कार्यकर्ता म्हणून शरद झोडगे यांची ओळख आहे.सध्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या पंकजाताई मुंडेना बालाघाटातुन विक्रमी मतदान करण्यासाठी शरद झोडगेंनी महायुतीची मोट बांधत गाव,वाडी,वस्ती, गल्लोगल्ली मतदारांशी हितगुज साधत व त्यांचे प्रश्न जाणुन घेत बालाघाट परिसर पिंजून काढला आहे. तसे पाहता बालाघाट परिसर हा कायम मुंडे कुटुंबाच्या पाठीशी राहणारा व हक्काचे मतदान असणारा परिसर आहे,स्वर्गीय मुंडेच्या शब्दावर आणी त्यांच्यावरील असणाऱ्या प्रेमामुळे आजतागायत बालाघाटावरील नागरिकांचे मत म्हणजे भाजपाच्या उमेदवाराला मत असे समिकरण बनलेले आहे, बालाघाटच्या गावागावात कमळ निशाणी पोहचवण्यासाठी शरद झोडगे सारखे निष्ठावंत असल्यामुळे सध्या पंकजाताई मुंडेचा विजय कुणीच रोखु शकत नाही,मुंडे कुटुंब व भारतीय जनता पक्षाशी इमान असलेल्या शरद झोडगे पाटील यांनी महायुतीतील सर्व नेत्यांना एकत्र आणत पकंजाताई मुंडे यांच्या पाठीमागे प्रचंड मोठी ताकत बालाघाटावर उभी केली असुन माजी सभापती काकासाहेब जोगदंड,पस सदस्य सुनिल झोडगे,अनुसुचित जातीमोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर,पस सदस्य दिपक काळे, सुंदर लांडगे,शिवाजी शिंदे,शहादेव चौधरी,सरपंच अप्पासाहेब झोडगे,भाजपा अल्पसंख्याक आघाडी बीड तालुका अध्यक्ष सलीम जहागिरदार,भागवत तांदळे,भुषण झोडगे,मोहनराव जोगदंड,बबलु शिंदे,कुमार मिटकरी,गणेश काकडे,ज्ञानेश्वर आंधळे,सुधीर चौधरी,आमोल कांबळे,शहादेव जोगदंड,लखन जोगदंड,अक्षय माळी यांच्यासह बालाघाटावरील अनेक नेते कार्यकर्ते एकत्र आणत पकंजाताई मुंडे यांना बळ देण्याचे काम बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा भाजपा नेते शरद झोडगे हे करत आहेत स्व गोपिनाथरावजी मुंडे यांचा विश्वासु कार्यकर्ता म्हणुन शरद झोडगे यांच्याकडे पाहीले जाते.

### जातीपातीच्या चष्म्यातुन पंकजाताईचं नेतृत्व बघु नका,

## आपल्या भल्यासाठी त्यांना सत्पात्री मतदान करून दिल्लीला पाठवा ; भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

पंकजाताई मुंडे यांच्या विजयाकडे लोक आता अपेक्षेने बघत असुन जातीपातीच्या राजकारणाच्या भिंती अंतिम टप्प्यात गळुन पडल्या. त्यांना खासदार करणं आपल्या जिल्ह्याच्यासाठी काळाची गरज असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रिय मंत्री नितीन गडकरींनी जिल्हा विकासाची जबाबदारी घेतली. दुरदृष्टीने समर्पक विचार करून सकारात्मक बघा. चुकीचा निर्णय घेवु नका. एवढेच नाही तर जातीपातीच्या चष्म्यातुन नेतृत्वाकडे न बघता त्यांचे पात्र सत्पात्री आहे, त्यात आपलं मतदान करून त्यांना दिल्लीला पाठवा असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.



निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात बीड विधानसभा मतदारसंघात शहरासह ग्रामीण भागात मस्केंनी झंझावती दौरे करत ठिकठिकाणी गाव बैठका, कॉर्नर बैठका घेत मागच्या पंधरा दिवसात जोरदार संपर्क साधला. गावागावात बोलताना त्यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीन गडकरी शिवाय काल छत्रपती उदयनराजे महाराज यांच्या जाहिर सभेनंतर संपुर्ण बीड जिल्ह्याचा मुड बदलुन गेला. प्रत्येकाला आपल्या जिल्हा विकासाची काळजी आणि भावी पिढीची काळजी असल्याने विकासाचा मुद्दा शेवटच्या टप्प्यात प्रभावी ठरला. बजरंग सोनवणे यांनी निवडणुकीला जातीपातीचा दिलेला रंग मतदारांना न पटल्याने तो फिका ठरला. ज्यामुळे अठरापगड जातीधर्माच्या लोकांना मतदान हे केवळ पंकजाताईलाच केलं पाहिजे. कारण हे नेतृत्व क्षमतावान असुन विरोधी उमेदवाराची त्यांच्यासोबत तुलनाच होवु शकत नाही. कर्तृत्व त्यांनी पालकमंत्री असताना सिद्ध केलं. या जिल्ह्यात २५ हजार कोटी रूपयांची कामे त्या काळात झाली. गडकरींना एक पत्र पाठवलं तर १० हजार कोटी रूपये रस्ते विकासाला मंजुरी मिळाली. असे नेतृत्व बीड जिल्ह्यातुन दिल्लीला पाठवलं तर विकासाच्या दृष्टीने आपला जिल्हा देशाच्या प्रगत नकाशावर आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे कुणी काहीही सांगत असेल तर अफवाला बळी न पडता पंकजाताई मुंडेंना प्रचंड मताने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. एवढेच नव्हे तर त्यांचा विजय हा काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. सुज्ञ मतदार बांधवांनी कोणत्याही भूलथापांवर विश्वास ठेवू नये .पंकजाताईच खासदार होणार आणि दिल्लीला जाणार हा विश्वास देखील त्यांनी बोलुन दाखविला.

## राज ठाकरेंना दिल्लीत बोलवून फाईल दाखवली:म्हणून मजबुरीने महायुतीचा प्रचार करावा लागतोय-वडेट्टीवार


**मुंबई**-राज ठाकरे यांना दिल्लीत बोलवून फाईल दाखवली आणि एनडीएचा प्रचार करण्यास सांगण्यात आले असा मोठा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच येणारे पंतप्रधान हा इंडिया आघाडीचेच असणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे असेही वडेट्टीवार म्हणालेत.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यात भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्यासाठी सभा घेतली. यावेळी बोलताना काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या पक्षाला मतदान करा हे सांगितले जात आहे. पुन्हा काँग्रेसचे सरकार आल्यास हे धर्मांध रस्त्यावर फिरणं कठीण करून ठेवतील असे राज ठाकरे म्हणाले होते. यावरून विजय वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे.याबाबत बोलतांना विजय वडेट्टीवार यांनी राज ठाकरे याना टोला लगावला आहे. ते म्हणाले, ''राज ठाकरे हे अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या यादीत योग्य आहेत

### लोकसभा निवडणुकीसंदर्भात शिवसेनेची जिल्हा बैठक संपन्न

# शिवसैनिकांनी महायुतीचा धर्म पाळून पंकजाताई मुंडे यांना भरगच्च मतांनी निवडून आणावे-जगताप, मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब तथा लोकप्रिय खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि सचिव संजय मोरे व उपनेते अर्जुन खोतकर, संपर्कप्रमुख विजय पाटील व विधानसभा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवारपंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना आपल्याला विक्रमी मताधिक्याने निवडून आणायचे आहे. पक्षाचा आणि पक्षप्रामुखाचा आदेश शिरसंवाद असतो. बाळासाहेबांचे संस्कार आपल्यावर आहेत त्यामुळे आदेश पाळणारे आणि महायुतीचा धर्म जपणारे आपण शिवसैनिक आहोत. छोटीमोठी नाराजी बाजूला सारून महायुतीचा धर्म पाळून शिंदे साहेबांच्या आदेशाचे पालन करा आणि बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांनी आपल्या शिवसैनिकांना केले. बीड लोकसभा निवडणुक २०२४ महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा शिवसेनेची काल शनिवारी दि.११ रोजी दु. १.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील बार्शी रोडवरील हॉटेल ग्रॅंड यशोदा येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये येत्या दोन दिवसात जीवाचे रान करुन महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्याचा निश्चय शिवसैनिकांनी घेतला आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले की, पक्षाचा आणि शिंदे साहेबांच आदेश शिरसंवाद आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून द्यायचं आहे. आदेशाचं पालन करणारा शिवसैनिक आहे हा आजावरचा इतिहास आहे. पंकजाताई मुंडे यांना भरगच्च मतांनी विजयी करून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांना शिवसैनिकांडून श्रद्धांजली अर्पण करायची आहे. पंकजाताई यांना भरगच्च मतांनी निवडून आणून आपल्या पक्षाच्या आदेशाचे पालन करायचे आहे पण याबरोबरच लोकसभा निवडणुकीच्या निकालादीवशीच सन्मानीय अनिलदादा यांचा वाढदिवस आहे त्यामुळे यंदाचा अनिलदादांचा वाढदिवस आपल्याला विजयी गुलाल





उधळून साजरा करायचा आहे. पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्याचा निश्चिय करा आणि येत्या दोन दिवसात आपली सर्व यंत्रणा कामाला लावा असे आवाहन सचिन भैय्या मुळूक यांनी केले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी सांगितले की, शिंदे साहेबांनी सांगितले की, युतीचा धर्म तुटला नाही पाहिजे. कुठली उणीव जर मित्र पक्षाकडून आपल्याला भासली असेल तर येणाऱ्या काळात ती उणीव मी भरून काढेल. युतीचा धर्म पाळण्यासाठी शिंदे साहेब रात्रंदिवस पळतायत. जर आपला नेता युतीचा धर्म पाळण्यासाठी अहोरात्र पळत असेल तर आपण देखील एक शिवसैनिक म्हणून आपल्या नेत्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई यांना निवडून आणायसाठी प्रयत्न करावेत.स्वर्गवासी गोपीनाथ मुंडे साहेबांचे केंद्रात मंत्री होऊन बीड जिल्हाचा सर्वांगीण विकास करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी येणाऱ्या दोन दिवसात पूर्ण ताकदीने पंकजाताई यांना निवडून देण्यासाठी आपलं योगदान द्यायचं आहे. बीडच्या शिवसैनिकांनी काम केले नाही अशी तक्रार शिंदे साहेबांकडे जाऊ नये असे काम शिवसैनिकांनी केले पाहिजे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांकडे कुणी बोट दाखवू नये यासाठी आपल्याला ताकदीने लढायचंय. सर्वांना दाखवून देयायचं शिंदे साहेब यांचे बीडचे शिवसैनिक काय करू शकतात.येणाऱ्या दोन दिवसात नाराजी सोडून युतीचा धर्म आणि शिंदे साहेबाचा आदेश म्हणून पूर्ण ताकदीने पंकजाताई यांना निवडुन आणा अशी विनंती दोन्ही जिल्हाप्रमुख यांच्या वतीने अनिलदादा जगताप यांनी केली. बैठकीसाठी बीड, माजलगाव, केज व परळी विधानसभा मतदारसंघातील उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, उपतालुकाप्रमुख , उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, सर्कल प्रमुख शाखाप्रमुख व शिवदूत तसेच, महिला आघाडी, युवा सेना, अल्पसंख्याक आघाडी, वैद्यकीय मदत कक्ष ,शेतकरी संघटनांचे सर्व पदाधीकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी केले.

# डॉक्टर नामदेवराव किरसान यांचा गाव दौरा




**चिमूर । प्रतिनिधी**

बहुदा कोणतीही निवडणूक संपली की उमेदवार नेतेमंडळी हे मतदारांना विसरून जातात. त्यानंतर ते ग्रामीण भागाकडे फिरूनही पाहत नाहीत, परंतु गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार डॉक्टर नामदेव किरसाण हे याला अपवाद ठरलेले आहेत.

गडचिरोली चिमूर या क्षेत्राचे पहिल्याच टप्प्यात १९ एप्रिल ला निवडणूक संपन्न झाली. निवडणुकीआधी अनेक पक्षाच्या उमेदवारांनी प्रचाराचा धुमाकूळ घालून क्षेत्रामधील गावागावात आपापल्या प्रचारासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना गावोगावी जाऊन भेटीगाठी घेत प्रचार केला. परंतु त्यानंतर कोणत्याही पक्षाचा उमेदवार हा शहरी भागात किंवा ग्रामीण भागात फिरकला नाही. परंतु भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार नामदेव किरसान हे याला अपवाद असून ते क्षेत्रातील गावोगावी फिरून कार्यकर्त्यांच्या व नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्या समस्या समजून घेण्यामध्ये व्यस्त असल्याचे प्रकर्षाने दिसून येत आहे. त्यांच्या या भेटीगाठी कार्यक्रमाला ग्रामीण भागातील नागरिकाकडूनही मोठा प्रतिसाद मिळत आहे.

ते शहरी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामाजिक राजकीय धार्मिक विकासात्मक अशा अनेक समस्या गावोगावी फिरून जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे. व मतदान केल्यामुळे मतदारांचे आभार सुद्धा मानत आहेत. त्यामुळे गडचिरोली चिमूर मतदार संघात त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सॉरी तसेच ग्रामीण भागातील मतदारांच्या भेटीगाठी घेऊन समस्या समजून घेताना माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनोहर पाटील पोरेटी, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमूरकर, जिल्हा अध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली महेंद्र ब्राह्मणवाडे, जिल्हाध्यक्ष परिवहन सेल रुपेश टिकले, जिल्हाध्यक्ष अनुसूचित जाती रजनीकांत मोटघरे, जिल्हाध्यक्ष किसान काँग्रेस वामनराव सावसाकडे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप घोडाम, जिल्हा उपाध्यक्ष नंदूजी नरोटे, प्रा.मदन प्रधान इत्यादी क्षेत्रातील नेते मंडळी सहकार्य करीत आहेत.

# सर्वधर्मीय समाज बांधवांचे महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन संपन्न

**सोनपेठ । प्रतिनिधी**

सोनपेठ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक नित्रुडकर कॉम्प्लेक्स येथे अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासंघ मराठवाडा अध्यक्ष तथा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत शिवा संघटना परभणी जिल्हा मार्गदर्शक सुभाष आप्पा नित्रुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय तृतीया दिनांक १० मे २०२४ ठीक १० वाजता महात्मा बसवेश्वर यांच्या शिल्पाचे पूजन सोनपेठ नागरी सहकारी बँक चेअरमन उमेशअप्पा नित्रुडकर यांच्या हस्ते पुजन करुन पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले, तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचेही पूजन करून पुष्पहार अर्पण करून सर्व धर्मीय समाज बांधवांच्या हस्ते पुष्प अर्पण करून महात्मा बसवेश्वरांना अभिवादन संपन्न झाले, या प्रसंगी उपस्थित माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राजेश दादा विटेकर, जिल्हा दक्षता सनियंत्रण समिती सदस्य प्रभाकर सिरसाट, माजी उपनगराध्यक्ष दत्तराव कदम, डॉ.सिद्धेश्वर हालगे, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गर्जे, डॉ.बिभीषण जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष पवार, डॉक्टर



राठोड, डॉक्टर चव्हाण, बालाजी वांकर , महादेव भोसले, कृष्णा अरबाड, प्रकाश पवार, विजय करवलकर, नागनाथ स्वामी, भागानंद स्वामी, रवी चिखलीकर, पत्रकार सिद्धेश्वर गिरी, दत्तराव मस्के पाटील, दयानंद भोसले, सुरेश चव्हाण, सुमित पवार युवा नेते, नाना झिरपे, उत्तमराव भाग्यवंत, योगेश नित्रुडकर, माणिक भालेकर, मदन सपकाळ, राजाभाऊ कराड, राजकुमार धबडे, प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये, बबन तिरमले, मिलिंद खंदारे, संदीप लष्करे, डॉ.अजिंक्य मुळे, संतोष घागरमाळे, पोलीस कर्मचारी, महसूल कर्मचारी, बळीराम काटे, राधेश्याम कुरे, डॉ.बालाजी पारसेवार, केदार वांकर, धम्मानंद खंदारे, बाळासाहेब मुळे, जय भवानी मित्र मंडळ पदाधिकारी, सोनपेठ शहरातील व तालुक्यातील बसव प्रेमींनी महात्मा बसवेश्वर यांच्या शिल्पास पुष्प अर्पण करून अभिवादन केले, या छोटेखाणी कार्यक्रमासाठी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासंघाचे तालुकाध्यक्ष विनोद चिमणगुंडे, सुहास नित्रुडकर , सदाशिव कोल्हेकर, नागनाथ कोटुळे , वैजनाथ चौंडे , कोंडीबा एकलारे, संपादक किरण स्वामी, प्रा.महालिंग मेहत्रे, नगरसेवक अमृत स्वामी, पोलीस पाटील बालाजी कुंभार व समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# बीड जिल्ह्यातील सकल महादेव कोळी समाजाचा पंकजाताई यांना जाहीर पाठिंबा

## पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी बीड जिल्ह्यातील महादेव कोळी समाज एकवटला

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महादेव कोळी महासंघाचे बीड लोकसभा अध्यक्ष गोरख आबा पुर्णे यांच्या वतीने धारूर तालुक्यातील भोगलवाडी फाटा जवळील सिद्धी मंगल कार्यालयामध्ये महादेव कोळी समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या मेळाव्याला हजारोच्या संख्येने बीड जिल्ह्यातील महादेव कोळी समाज उपस्थित होता यावेळी मेळाव्याला मोबाईलद्वारे पंकजाताई मुंडे यांनी संबोधित केले त्या म्हणाल्या की,महादेव कोळी समाजला जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी प्रयत्नशील राहील तशाच बीड जिल्ह्याच्या खासदार प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे यांनी पण मार्गदर्शन महादेव कोळी समाजाला केलं लवकरच जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांच्यासोबत लवकरच बैठक लावून जातीच्या प्रमाणपत्राचा प्रश्न सॉल करू असे आश्वासन त्यांनी दिले त्याबद्दल महादेव कोळी समाजाच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले बीड जिल्ह्यातून महादेव कोळी समाज बांधव यावेळी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार रमेश दादा पाटील व भाजपाचे ज्येष्ठ नेते रमेशरावजी आडसकर, वैजनाथ बँकेचे व्हॉइस चेअरमन रमेश दादा कराड,जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग भैय्या सोळंके,जि.प.अध्यक्ष मिराताई गांधले,महादेव तोंडे,शिवाजी अप्पा मुंडे,मुंजा निरंडे सर,दिपक बिल्पे ,धनंजय सर,बन्सी गांधले,बालाजी गांधले,विष्णू बिल्पे,बलभीम निरंडे,भाजपा तालुका उपाध्यक्ष गणेश बंडे , भाजपा तालुका उपाध्यक्ष दादा साहेब गुळवे व कोळी महासंघाचे राष्ट्रीय पदाधिकारी बीड जिल्ह्यातील कोळी महासंघाचे नेते मंडळी तसेच जिल्हाध्यक्ष महादेव कंडुकटले, लोकसभा अध्यक्ष गोरख पुर्णे परळी तालुकाध्यक्ष रामभाऊ वाघमारे,विधानसभा अध्यक्ष नंदूभाऊ बळवंत,गेवराई तालुकाध्यक्ष रवी मोरे,माजलगाव विधानसभा अध्यक्ष सुधाकर कांबळे,बीड तालुका अध्यक्ष तानाजी मोरे,अंबाजोगाई तालुका अध्यक्ष अरुण दहिभाते,केज विधानसभा अध्यक्ष राजेभाऊ यशवंते,आष्टी पाटोदा तालुका अध्यक्ष दत्ता तावरे,यावेळी सर्व कोळी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते यांच्या एक मताने बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीचे अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी महादेव कोळी महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निवडणुकीतही अमोल कोल्हेंचा नौटंकीपणा सुरू डायलॉगबाजी करणाऱ्यांच्या डायलॉगला भुलू नका-भाजपा आ.दरेकर

**चाकण । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत आज शिरूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या समर्थनार्थ सभा पार पडली. या सभेत पावसानेही हजेरी लावली. त्या भरपावसात व्यासपीठावरून भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी अमोल कोल्हे यांच्यावर तुफान फटकेबाजी केली. अभिनेता चांगल्या प्रकारे अभिनय करू शकतो. आता निवडणुकीतही त्याची नौटंकी, नाटकीपणा सुरू आहे. कदाचित ते डायलॉगबाजी करू शकतात पण सर्वसामान्यांची कामं करू शकत नाही, असा टोला दरेकरांनी लगावला. तसेच शिरूरच्या जनतेने विकास करणाऱ्यांच्या बाजूने उभे रहावे, केवळ डायलॉगबाजी करणाऱ्यांच्या डायलॉगला भुलू नये, असे आवाहनही दरेकर यांनी केले. भरपावसात सभेत बोलताना दरेकर म्हणाले की, जाणता राजा साताऱ्यात पावसाची एक सर अंगावर आली तेथील खासदार निवडून आला अजित पवार तर अखंड पावसात भिजताहेत मतांचा पाऊस त्यांच्यावर पडल्याशिवाय राहणार नाही असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला. ही निवडणूक देशाच्या दृष्टीने महत्वाची आहे. कोण खासदार होणार, कुठल्या पक्षाचा होणार यापेक्षा या देशाने नेतृत्व कोण करणार ही ठरवणारी ही निवडणूक आहे. देशवासियांनी ठरवले आहे की १० वर्ष मोदी देशाला प्रगतीकडे नेऊ शकतात तर पुढील पाच वर्षही देशाचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी करतील. ही देशाचा पंतप्रधान कोण असणार हे ठरविणारी निवडणूक आहे. गेली ५० वर्ष जे काँग्रेसवाले करू शकले नाहीत ते १० वर्षात पंतप्रधान मोदींनी प्रामाणिकपणे देशाच्या विकासासाठी काम केले, हे आपण नाकारू शकत नाही. अमोल कोल्हे यांचा समाचार घेताना दरेकर म्हणाले की, ही एक अभिनेता आणि एक नेता कार्यकर्ता अशी लढाई आहे. अभिनेता चांगल्या प्रकारे अभिनय करू शकतो. आता निवडणुकीतही त्याची नौटंकी, नाटकीपणा सुरू आहे. कदाचित आपण डायलॉगबाजी




करू शकता पण सर्वसामान्यांची कामं करू शकत नाही. सर्वसामान्यांची कामं हा नेता, कार्यकर्ता करू शकतो, ते शिवाजीराव आढळराव पाटील असल्याचा उल्लेखही दरेकरांनी केला. दरेकर पुढे म्हणाले, काल त्यांची सभा झाली. त्या सभेत आढळराव पाटील, अजित पवार, पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका झाली. त्यापलीकडे भाषण गेले नाही. विकासाच्या चार गोष्टी भाषणात आल्या नाहीत. आढळराव पाटील यांनी कुठल्यातरी देवस्थानाची १३ एकर जमीन लाटली असल्याची टीका केली. अरे अमोल कोल्हे दुसऱ्याच्या ताटात वाकून बघताना अशोक पवार जे घोडगंगा साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. मल्लिकार्जुन देवस्थानाने ११३ एकर जागा दिली होती ती जागा हडप करण्याचे काम अशोक पवारांनी केलेय. जे देवाला फसवतात ते तुमची सेवा काय करणार. घोडगंगा कारखाना बंद आहे. स्वतःचा खासगी व्यंकटेश्वर कारखाना सुरु आहे. परंतु सर्वसामान्यांचा कारखाना सुरू नाही हे अमोल कोल्हेचे कर्तृत्व असल्याचा घणाघातही दरेकरांनी केला. दरेकर पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी, नितीन गडकरी यांच्या माध्यमातून रस्त्यांचे जाळे विणले जातेय. विकास दिसून येतोय. आम्ही विकास करणारी लोकं आहोत. तुम्ही विकास करणाऱ्यांच्या बाजूने उभे रहा केवळ डायलॉगबाजी करणाऱ्यांच्या डायलॉगला भुलू नका. आमची सत्ता ही सर्वसामान्यांसाठी आहे. ती तुम्हाला कळणार नाही. तुम्ही जनतेत नसता, पाच वर्षातून एकदा उगवता हे शिरूरवासियांना माहित आहे. चासकमाण कालव्यासाठी महायुती सरकारने देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने १९५७ कोटी रुपये दिले. आम्ही देणारे आहोत. अबकी बार ४०० पारचा नारा दिलाय. त्यावेळी या ४०० पारमध्ये छत्रपतींच्या भूमितील आमचे शिवाजी आढळराव पाटील गेले पाहिजेत, ती जबादारी पार पाडा, असे आवाहनही दरेकरांनी केले.

# उमेदवारांची निवडणूक खर्चाची तिसरी तपासणी यशस्वी संपन्न




**शिर्डी । प्रतिनिधी**

खर्च निरीक्षक ममता सिंग यांच्या उपस्थितीत शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांची निवडणूक खर्चाची तिसरी तपासणी राहाता येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे आज यशस्वीपणे पार पडली. या तिन्ही तपासणींसाठी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधी उपस्थित राहून तपासणीच्या कामकाजांमध्ये प्रशासनाला सहकार्य केले. याबाबत खर्च निरीक्षक ममता सिंग यांनी समाधान व्यक्त केले.

या तपासणीस सर्व २० उमेदवारांपैकी काही उमेदवार स्वत: व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याप्रसंगी निरीक्षक ममता सिंग यांनी स्वतः सर्व उमेदवारांच्या खर्चाच्या नोंदवह्यांची काटेकोरपणे तपासणी केली. प्रथम व द्वितीय तपासणीनंतर उमेदवारांच्या खर्चाची दैनंदिन नोंदवही मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. या तपासणीनंतरही उमेदवारांच्या खर्चाची दैनंदिन नोंदवही मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार आहे. सर्व उमेदवारांनी त्यांचा खर्च निवडणूकीच्या निकालाच्या दिनांकापर्यंत (४ जून) त्यांच्या दैनंदिन खर्च नोंदवहींमध्ये नोंदवावा, तसेच सदरच्या खर्चाचा हिशोब तंतोतंत जुळवून अनुषंगिक सर्व लेखे तयार करून २९ जून रोजी पुढील तपासणीसाठी व ताळमेळ घेण्यासाठी सादर करावेत, असे आवाहन खर्च निरीक्षक ममता सिंग यांनी केले आहे. या तपासणीला समन्वयक अधिकारी (खर्च) सदाशिव पाटील, सहायक समन्वय अधिकारी (खर्च) बाबासाहेब घोरपडे व सचिन धस, सहायक खर्च निरीक्षक विवेक वर्मा, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# २०२४ चा आनंद भूषण पुरस्कार ह भ प गोविंद गाडगे महाराज यांना प्रदान करण्यात आला

**अहमदनगर । प्रतिनिधी**

आज दिनांक १० ५ २०२४ रोजी खादगाव टाकळी येथे दीड दिवसाचा मेळावा संपन्न संपन्न झाला या मेळाव्यामध्ये आनंद भूषण पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो आणि आज २१ वर्षे पूर्ण झाली आहे

आनंद संप्रदायामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीला श्रीपाद बाबा यांच्या नावाने आनंद भूषण पुरस्कार देण्यात येतो ज्या व्यक्तीने विशेष उल्लेखनीय कार्य केले समाजामध्ये समाज प्रबोधन घडवून आणले अशा व्यक्तीला श्रीपाद बाबांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार देण्यात येतो यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योगपती बाळासाहेब शहाणे होते यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक खंदारे सर यांनी केले . प्रस्ताविकामध्ये त्यांनी आळंदी ते पंढरपूर या दिंडी विषयी मनोगत व्यक्त केले . आणि एक सुंदर अशी आनंद जीवन ही कविता सादर केली

कोते महाराजांनी मनोगत व्यक्त केले आणि शुभेच्छा दिल्या तसेच कानडे साहेबांनी मनोगत व्यक्त करून गाडगेबाबांना शुभेच्छा दिल्या

अध्यक्ष भाषणात श्री शहाणे साहेबांनी हा पुरस्कार म्हणजे शब्बासकी आणि कामाची



एक पावती आहे पुढे एक मोठी कामाची जिम्मेदारी त्यांच्या अंगावर पडते असे मनोगत व्यक्त केले

पुरस्काराला उत्तर देताना गोविंद महाराज गाडगे म्हणाले या पुरस्काराला मी लायक आहे का माझ्याकडून श्रीपाद बाबांची सेवा केली माझ्या जीवनामध्ये जो पालट झाला ती एक बाबांची कृपा होती साधकांनी नाम घेणे आवश्यक आहे.तुमच्यामध्ये देव आहे आणि या देवाची ओळख करून जर करून घ्यायची असेल तर संताकडे गेली पाहिजे. संतांची एक स्पष्ट विचार असतात व्यक्तीला विसरले तरी चालेल पण संतांनी दिलेले जे नाम आहे ते विसरता कामा नये असे सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह भ प नरवडे सर यांनी केले आणि कार्यक्रमाचे नियोजन मंडळातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंडळातील कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी उत्कृष्ट मेळाव्याचे नियोजन केले हा कार्यक्रम गोरख नरवडे यांनी मोलाचे कार्य केले या कार्यक्रमाला मुंबई पुणे ठाणे शिरूर नगर लांबून त्या ठिकाणी लोक आलेली होती या कार्यक्रमाला सिताराम महाराज माळी माळी महाराज गुरुवर्या अरुणाताई वाघ सर शब्दगंध चे गिरीसर उपस्थित होते

# खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा प्रशिक्षण शिबिरे महत्वपूर्ण-कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे

## २० दिवसीय योगा व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा समारोप






**गडचिरोली | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि आत्मिक विकासासाठी खेळ अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खेळातून कुशलता, डावपेच, अचूकता, शोधवृत्ती, आरोग्य सदृढता आदी मूल्यांची जपणूक होत असून खेळाडू घडविण्याचे मुख्य स्त्रोत प्रशिक्षण शिबीर आहे. अशा क्रीडा प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांवर शारीरिक व मानसिक संस्कार केले जातात. खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा प्रशिक्षण शिबिरे महत्वपूर्ण ठरतात, असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले.

आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवनच्या वतीने आयोजित योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा समारोप आनंद निकेतन महाविद्यालयाच्या प्रांगण्यात झाला, याप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाला महारोगी सेवा समितीचे संचालक डॉ. विकास आमटे, उपविभागीय पोलीस अधिकारी नवमी साटम, आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे, उपप्राचार्या डॉ.राधा सवाने, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले, समाजाला सकारात्मक दिशेने नेण्याचा आनंदवन चा संकल्प असून भावी पिढी घडविण्याचे कार्य आनंदवन करीत आहे. आनंदनिकेतन महाविद्यालयाने योगा व क्रीडा प्रशिक्षण शिबिर उपक्रम पाच वर्षांपूर्वीच सुरू केला. आज लहानांपासून तर मोठ्यापर्यंत सर्वांचा कल मोबाईल वापराकडे अधिक दिसून येतो हे टाळायला हवे. मुलांवर कोणते संस्कार करावेत हे पालकांना ठरवायचे असते. पालकांनी या शिबिराला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्यामुळे ७३६ विद्यार्थी या क्रीडा प्रशिक्षण शिबिरात सहभागी होऊ शकले. या २० दिवसीय शिबिरात हजारो खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे. समाजाला सकारात्मक दिशेने नेण्याचा आनंदनिकेतन महाविद्यालय व आनंदवनचा ७५ वर्षापूर्वीचा संकल्प होता. तो या शिबिराच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना दिसत आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले. डॉ. बोकारे पुढे म्हणाले, आनंदवन एक-दोन नव्हे तर निरंतर पाच वर्षापासून योग व क्रीडा प्रशिक्षणाचा उपक्रम चालवीत आहे. आनंदवन जसे ७५ वर्षे अविरतपणे सुरू आहे तसेच हा उपक्रम सुद्धा येणाऱ्या ७५ वर्ष अविरतपणे सुरू राहील, हे आनंदवनच्या सामाजिक तळमळीची पावती असल्याचेही ते म्हणाले. त्यासोबतच, श्रद्धेय बाबा आमटे यांनी ७५ वर्षांपूर्वी लावलेल्या आनंदवनसारख्या ज्योतीचे, दिव्यात व त्यानंतर मशालीत रूपांतर झाले. पुढे याच मशालीचे सूर्यात रूपांतर होणार असल्याचा विश्वास डॉ.बोकारे यांनी व्यक्त केला.श्रद्धेय बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी आनंदवन उभे केले. आनंदवनात बाबा आमटे यांची तिसरी ते चौथी पिढी कार्यरत असल्याचे डॉ.विकास आमटे यांनी सांगितले. आनंद निकेतन महाविद्यालय येथे आयोजित क्रीडा प्रशिक्षण शिबिराला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झालेत. याबद्दल त्यांनी पालकांचे अभिनंदन केले. त्यासोबतच, आनंदवनातील कुष्ठरुग्ण व अंधांसाठी थेरेपेटीक स्विमिंग पूल, व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण आणि व्यसनमुक्तीकडे वाटचाल आदी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही डॉ.आमटे यांनी यावेळी सांगितले.

उपविभागीय पोलिस अधिकारी नवमी साटम म्हणाल्या, जीवनात लागणारे कौशल्य व मूल्य खेळातूनच मिळतात. खेळातून विद्यार्थी सहकार्याचे मूल्य, प्रभावी संवाद आणि सांघिक कार्य शिकतात. खेळ अनेकदा विद्यार्थ्यांना संघाचा कर्णधार किंवा प्रशिक्षक यासारख्या नेतृत्वाची भूमिका स्वीकारण्याची संधी देतात यातून विद्यार्थ्यांच्या अंगी नेतृत्वाची भावना वाढीस लागते. तसेच खेळ विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील इतर क्षेत्रांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते. त्यासोबतच विद्यार्थ्यांना अनुशासन हे मैदानातूनच मिळत असते. खेळातून ध्येयनिश्चित करणे व ते साध्य करणे विद्यार्थी शिकू शकतात. त्यामुळे भविष्यात शैक्षणिक आणि करिअरच्या उद्दिष्टांसाठी ही कौशल्ये अमूल्य असल्याचेही त्या म्हणाल्या.

**विद्यार्थ्यांना पारंपरिक खेळ व क्रिडाप्रकारांचे प्रशिक्षण**

वीस दिवसीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना २८ विविध क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण नियमित दिल्या गेले. यामध्ये योगासन, कराटे, क्रिकेट, फुटबॉल, एरोबिक्स, मल्लखांब, नेटबॉल, खो-खो, बॅडमिंटन आदींचे प्रशिक्षण देण्यात आले.

**प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडून विविध खेळ प्रकार आणि कवायतीचे सादरीकरण**

सदर शिबिरामध्ये योग कवायत, लाठी कवायत, दंडबैठक कवायत, घुंगरू काठी, रोप मल्लखांब, लेझिम, कराटे, सूर्यनमस्कार आदी खेळ प्रकार, कवायत व प्रात्यक्षिकाचे सादरीकरण प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडून करण्यात आले.

**उत्कृष्ट प्रशिक्षक व शिबिरार्थींचा सत्कार**

विवेक दुबे, अक्षिता तिखट, दीपक शिव, कुणाल दातारकर, मयुरी गाडगे, नरेंद्र कन्नाके, उषा उरकुडे, प्रियंका कडस्कर, चेतन चिंचोळकर, पंकज शेंडे, श्रीकांत लोहकरे, अक्षिता तिखट, सायली उपरे आदी प्रशिक्षकांचा तसेच आर्यन काळे, आयुष महल्ले, कस्तुर राऊत, विधी भोगेकर, शुभ्रा ठाकरे आदी शिबिरार्थींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.






# विविध उपक्रमातून बोलीभाषेच्या शब्दांची पेरणी करा-अरूण झगडकर

**गोंडपिपरी | सुरज माडूरवार**

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल तर महाराष्ट्रातील विविध बोलीभाषा टिकणे आवश्यक आहे. बोली टिकली तरच भाषा टिकेल त्यासाठी विविध उपक्रमातून बोली भाषेतून शब्दांची पेरणी करा. असे प्रतिपादन झाडीबोली साहित्य मंडळ चंद्रपूर जिल्हाध्यक्ष अरुण झगडकर यांनी केले.



झाडीबोली साहित्य मंडळ बल्लारपूर शाखेच्या वतीने विविध आभासी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अलग या साहित्य प्रकारावर मार्गदर्शन करण्याकरिता बल्लारपूर येथील जुबेदा मंजिलच्या लेखिका अर्जुमन शेख, गडचिरोली येथील सुप्रसिद्ध अलगकार उपेंद्र रोहणकर यांनी मार्गदर्शन केले. मुक्तछंद या काव्य प्रकारावर कवी भाविक सुखदेवे ब्रम्हपुरी व राजुरा येथील सुप्रसिद्ध कवी विरेनकुमार खोब्रागडे यांनी सखोल मार्गदर्शन केले. अभंग लेखन कसे करावे याविषयी विस्तृत विवेचन गोंदिया येथील सुप्रसिद्ध अभंगकार मुर्लीधर खोटेले तर भद्रावती येथील बोलीतून अभंग रचना करणारे कवी अरुण घोरपडे यांनी मार्गदर्शन केले. अष्टाक्षरी काव्य प्रकारातील शास्त्रशुद्ध माहिती कवी अरुण झगडकर यांनी मांडली, तर गजलेचे बारकावे आणि तंत्र यावर गझलकार दिलीप पाटील तसेच झाडीपट्टीचे गझलकार लोकराम शेंडे यांनी गजलेवर विस्तृत मार्गदर्शन केले.झाडीबोली साहित्य मंडळ बल्लारपूर शाखेतर्फे अशा विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते.आज पर्यंत महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रात विविध नामवंत लोकांच्या मुलाखती सुद्धा घेऊन साहित्यसेवा निरंतर सुरु आहे. महिनाभर चाललेल्या या सर्व आभासी उपक्रम मालिकेचे सूत्रसंचालन तालुका शाखाध्यक्ष प्रशांत भंडारे, कवी सुनील बावणे, कवी सुनील पोटे यांनी केले.

# वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी ऑनलाईन प्रशिक्षण तात्काळ आयोजित करा

## आमदार सुधाकर अडबाले यांची राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे मागणी

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्यातील पात्र शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य यांनी १२ / २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी ऑनलाईन प्रशिक्षण तात्काळ आयोजित करावे, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे केली आहे.



राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालये या गटातील पात्र शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य यांनी १२ / २४ वर्षे सेवा पूर्ण झालेले शिक्षक प्रशिक्षणासाठी पात्र असताना प्रशिक्षण आयोजित न केल्यामुळे आर्थिक लाभापासून वंचित आहेत. मागील वर्षीसुध्दा हीच परिस्थिती होती. तेव्हा आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रशिक्षण आयोजित करण्याची मागणी केल्यानंतर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे कडून प्रशिक्षण आयोजित केल्या गेले व शेकडो शिक्षकांना त्यांचा लाभ झाला होता.वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणाचे नियोजन व संनियंत्रणाची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे सोपविण्यात आलेली आहे. सदर प्रशिक्षणासाठी ऑनलाईन नोंदणीकरिता परिषदेमार्फत पोर्टल विकसीत करण्यात आलेले आहे. सदर पोर्टलवर पात्र शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य यांना नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी व वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी ऑनलाईन प्रशिक्षणासाठी पात्र शिक्षकांसाठी तात्काळ प्रशिक्षण आयोजित करावे, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# पिक विम्याची रक्कम न मिळाल्यास रिट याचिका दाखल करणार-कमलाकर ठाकरे

**चिमूर | प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात सन २०२३-२०२४ या वर्षात सोयाबीन, कपास या पिकाचे पावसामुळे मोठे नुकसान झाले. या पिकाकरिता शेतकऱ्यांनी जून महिन्यामध्येच विमा काढलेला होता. शेतकऱ्यांनी नुकसानिबाबत कृषी विभागाकडे तक्रारी दाखल केल्या. त्याची दखल घेऊन कृषी विभाग व विमा कंपनीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन चौकशी करून नुकसानीचे पंचनामे केले. परंतु अजूनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही. त्यामुळे जवराबोडी येथील शेतकरी तसेच चिमूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते कमलाकर ठाकरे यांनी जिल्हा कृषी अधिकारी यांना निवेदन देऊन तालुक्यातील शेतकऱ्यांना पंधरा दिवसात नुसकान भरपाई देण्यात यावी, अन्यथा याबाबत रीट याचिका दाखल करू असा



अल्टिमेट दिला आला आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील चिमूर तालुक्यातील भिशी परिसरात अति पावसामुळे झालेल्या नुसकानीची पाहणी केली. व जिल्हा कृषी अधिकारी व विमा कंपनीला २५ टक्के नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश दिले. परंतु कृषी विभाग व विमा कंपनीने मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाला केराच्या टोपलीत टाकून परिसरातील शेतकऱ्यावर अन्याय केला. त्यामुळे परिसरातील बरेच शेतकरी शासनावर संतप्त झाले. मागील महिन्यात परिसरातील परिसरातील मोजक्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अंतर्गत २५ टक्के विमा कंपनीकडून व कृषी विभागाकडून देण्यात आला. परंतु अजूनही ९० टक्के शेतकरी हे विम्यापासून वंचित आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना येत्या पंधरा दिवसात विमा कंपनीकडून विमा मिळवून देण्यासाठी जिल्हा कृषी अधिकारी यांनी दखल घ्यावी, अन्यथा अन्यायग्रस्त शेतकरी विमा कंपनी व कृषी विभाग यांचे विरोधात नागपूर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणार या प्रकारचे निवेदन जिल्हा कृषी अधिकारी शंकरराव तोटावर तसेच तालुका कृषी अधिकारी ज्ञानदेव तिखे व विमा कंपनीला देण्यात आले आहे.

# नगरपरिषद मूल ची मान्सूनपूर्व शहर स्वच्छता मोहीम कौतुकास्पद

**मूल | प्रतिनिधी**

नगरपरिषद मूल तर्फे मान्सूनपूर्व शहर स्वच्छता मोहीम जोरात सुरू झाल्याचे चित्र शहरात बघावयास मिळत आहे. तसेही शहरात डुकरांचा हैदोस वाढल्याच्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन न.प.प्रशासनाने शहर स्वच्छतेकडे अधिक लक्ष केंद्रित केल्याने नागरिकांच्या मागणीनुसार प्रभाग,वॉर्ड,अंतर्गत रस्ते,खाली भुखंड यावरील घनकचरा,डबके,झाडेझुडपे स्वच्छ करण्याच्या सपाटा न.प.तर्फे लावण्यात आलेला दिसत आहे.

शहरात गत तिन वर्षात जवळपास प्रत्येक वॉर्डात भूमिगत व खुल्या गटारांची बांधकामे झाली आहेत. पावसाळा सुरू झाल्यानंतर गटारे सफाई न झाल्याने पाणी वाहून न जाता रस्तावर पसरून अनारोग्य व अस्वच्छता वाढीस लागण्याची भिती यामुळे अनेक ठिकाणी जेसीबीचा वापर करून यंदा नगरपरिषद तर्फे



मान्सूनपूर्व सफाई मोहीम आधीच सुरू करून सफाईचा शुभारंभ केला आहे. सोबतच शहरातील गल्लीबोळात अवकाळी पावसाने वाढलेली झाडेझुडपे डुकरांचा हैदोस वाढविण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता लक्षात घेऊन सफाई मोहीम राबविण्यात येत असल्याचे व नागरीकांच्या मागणीनुसार ही मोहीम सुरू राहणार असल्याचे आरोग्य स्वच्छता निरीक्षक अभय चेपूरवार यांनी सांगितले आहे. लवकरच इतर जिल्हातील चमू शहरात येऊन पोलीस बंदोबस्तात डुकरे पकडण्याची मोहीम सुरू होणार असल्याचेही न.प.प्रशासनाने कळविले आहे. सध्या नगरपरिषद कडे ८ नियमीत सफाई कामगार व ठेकेदाराने पुरविलेले ५७ कामगार,३ ट्रॅक्टर,१० घंटागाडी ,३ स्वच्छता सुपरव्हायजर संपुर्ण वर्षभर कार्यरत असून नगरपरिषद मुख्याधिकारी पवार,श्रीकांत समर्थ अभियंता पाणी प पुरवठा व स्वच्छता, स्वच्छता व आरोग्य निरीक्षक अभय चेपूरवार यांचे देखरेखीत सदर संपुर्ण यंत्रणा मान्सूनपूर्व सफाई मोहीमेत सहभागी झाली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .